**कृपया प्रसिध्दीसाठी -** **16 डिसेंबर 2008**

## मुरली देवरा विमान कंपन्यांवर मेहेरबान
## स्वयंपाकाचा गॅस व डिझेल ची दरकपात नाही
## सरकारचे डोके ठिकाणावर नाही - राम नाईक

**मुंबई, मंगळवार :** "आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाची किंमत पुन्हा खाली आल्यामुळे 15 दिवसाच्या आत हवाई इंधनाचा (एव्हीएशन टर्बाइन फ्युएल) प्रति लिटर दर पेट्रोलियम मंत्री श्री.मुरली देवरा यांनी पुन्हा रु.4.38 कमी करुन श्रीमंतांच्या विमानप्रवासाला मदत केली आहे. मात्र स्वयंपाकाचा गॅस प्रति सिलेंडर रु.50 आणि डिझेल रु.3 प्रति लिटर कमी न करुन 'आम आदमी' च्या जखमेवर मीठच चोळले आहे", अशी प्रतिक्रिया माजी पेट्रोलियम मंत्री श्री.राम नाईक यांनी आज मुंबईत प्रसिध्द केलेल्या पत्रकात दिली आहे.

यासंबंधी अधिक माहिती देताना श्री.राम नाईक म्हणाले, "जून 2008 मध्ये आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचा भाव 147 प्रति बॅरल इतका वाढला होता. त्यावेळी काँग्रेस सरकारने पेट्रोल रु.5, डिझेल रु.3 प्रति लिटर, तर स्वयंपाकाचा गॅस प्रति सिलेंडर रु.50 ने वाढविला होता. त्यानंतर कच्च्या तेलाचा भाव डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात 50 डॉलरपेक्षा कमी झाल्याने पेट्रोल प्रति लिटर रु.5, डिझेल प्रति लिटर रु.2 तर हवाई इंधन प्रति लिटर रु.38.10 याप्रमाणे कमी करण्यात आले. आता तर कच्च्या तेलाचा भाव 41 डॉलर म्हणजेच 72 टक्के कमी झाला आहे. तरीही डिझेल आणि स्वयंपाकाचा गॅस यांचे वाढविलेले दर कमी करण्यात आलेले नाहीत. या तुलनेने ऑगस्ट 2008 मध्ये हवाई इंधनाचा दर प्रति लिटर रु.73.67 होता तो आता 16 डिसेंबर रोजी रु.33.72 करण्यात आला आहे. म्हणजेच ऑगस्ट ते डिसेंबर या काळात रु.39.95 प्रति लिटर कमी करण्यात आला आहे. श्रीमंतांच्या इंधनाला मात्र सवलत परंतु घरगुती स्वयंपाकाचा गॅस आणि डिझेल यांचे दर कमी न करणे ही संतापजनक बाब आहे. तसेच स्कूटर, मोटार सायकल, मोटार कार यासाठी लागणा-या पेट्रोलचा दर आहे रु.50.07 प्रति लिटर तर हवाई इंधनाचा दर आहे रु.33.72. म्हणजेच हवाई इंधन पेट्रोल पेक्षा प्रति लिटर रु.16.35 ने स्वस्त आहे. हा विरोधाभास म्हणजे सरकारचे डोके ठिकाणावर नसल्याचाच पुरावा आहे."

"आंतरराष्ट्रीय तेलाचे घसरलेले भाव लक्षात घेऊन स्वयंपाकाच्या गॅसमध्ये रु.50 प्रति सिलेंडर आणि डिझेलमध्ये रु.3 प्रति लिटर भाव कमी न केल्यास जनतेला उग्र आंदोलन करावे लागेल", असा इशाराही श्री.नाईक यांनी दिला आहे.

**(कार्यालय सचिव)**